वाचले :- १] शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्रमांक एलएनडी/
३४८६/१७९३/प्र.क्रं. ५०१९/ग-६ दिनांक १२.१२.१९८८
२] मा. आयुक्त पुणे विभाग पुणे यांचिकडील पृष्ठांकन क्रमांक
महसूल [२] ग्रामीण-१६३३ दिनांक २.१.१९८९

---

जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे
महसूल शाखा
क्रमांक पमअ/एसआर/ ११७५ /तीन
पुणे-१ दिनांक ८ -२-१९८९

विषय :- जमीन - पुणे
स.नं. १११ काळे कॉलनी तालुका मावळ
नुतन महाराष्ट्र विदयाप्रसारक मंडळाचे पवना
विदया मंदीरास देणेबाबत....

आ दे श :
======

शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्रमांक एलएनडी ३४८६/१७९३/प्र.क्रं. ५०१९/ग-६ दिनांक १२.१२.१९८८ अन्वये मौजे काळे कॉलनी तालुका मावळ येथील स.नं. ११४/४ क्षेत्र १ ए.१२ गुं. या संपादीत जमीनीपैकी १४३०.४७४२ चौ.मि. [ १५३९८ ] चौ.फूट क्षेत्र त्यावर बांधणेत आलेल्या शेड सहीत, नुतन महाराष्ट्र विदया प्रसारक मंडळ तळेगांव दाभाडे या संस्थेच्या पवना विदया मंदीरासाठी शाळेच्या उपयोगाकरिता देणेसाठी प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार मी जिल्हाधिकारी पुणे शासनाने दिलेल्या मान्यतेस अधिन राहुन मौजे काळे कॉलनी तालुका मावळ येथील स.नं. १११/४ पैकी १४३०.४७ चौ.मि. [ १५३९८ चौ.फुट ] क्षेत्र नुतन महाराष्ट्र विदया प्रसारक मंडळ या शैक्षणिक संस्थेस त्याचे पवना विदया मंदीरासाठी महाराष्ट्र जमीन महसुल [ सरकारी जमीनीची विल्हेवाट ] नियम १९७१ मधील नियम क्रमांक ६ व शासन निर्णय महसुल व वने विभाग क्रमांक एलआरएफ३४८१/३५३१८/प्र.क्रं. ३१७६/ग-६ दिनांक १.६.८५ मधील तरतुदीस अधिन राहुन प्रदान करणेचे आदेश खालील अटी व शर्तीवर देत आहे.

२. संस्थेस प्रदान केलेल्या क्षेत्रापैकी १४३०.४७४२ चौ.मि. [१५३९८ चौ.फूट ] मा. कार्यकारी अभियंता खडकवासला विभाग क्रमांक १ या खात्याचे ताब्यात आहे. वरील क्षेत्र संस्थेस देण्यासाठी महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करणेस शासन पाटबंधारे क्रमांक बीएचए/२०७५/१६४५५/[४८५]एमएजे १३/४ दिनांक १३.४.१९७७ अन्वये मान्यता दिलेली असुन जमीनीत असणा-या इमारतीचे [ शेडचे ] पर्यंत मुल्य ठरविले आहे. या वरुन मी असाही आदेश देतो की, वरील क्षेत्राचा ताबा तहसिलदार मावळ यांनी पाटबंधारे ..२..

मुख्याध्यापक
पवना विद्या मंदिर
पवनानगर, ता.मावळ, जि.पुणे

मुख्याध्यापक
पवना विद्या मंदिर
पवनानगर, ता.मावळ, जि.पुणे

विभागाच्या स्थानिक अधिका-याकडुन प्रथम घेण्यात यावा.

२] प्रतिग्रहित्या संस्थेने शाळेच्या इमारतीसाठी प्रदान केलेल्या क्षेत्राची कब्जेहक्काची किंमत रुपये [ ५३२/-] पाचशे बत्तीस फक्त उक्त क्षेत्राचा ताबा घेणेपूर्वी शासकिय कोषागारात तहसिलदार मावळ यांचे मार्फत भरावी.

३] प्रतिग्रहित्या संस्थेने जमीनीत असणा-या इमारतीचे शेड क्रमांक ४ व ५ याचे [ depreciated cost ] घटीत मुल्य रुपये २१,७८०/- पाटबंधारे विभागाकडे ताबा घेणेपूर्वी भरेल.

४] प्रतिग्रहित्याने आदेशातील सर्व शर्ती व अटी मान्य असलेबाबत ५/- रुपयाचे स्टॅम्प पेपरवर हमी पत्र दयावे.

५] प्रतिग्रहित्यास शासन मंजुरी शिवाय सदर जमीन अथवा जमीनीचा काही भाग हस्तांतर करता येणार नाही.

६] प्रतिग्रहित्या भोगवटादार वर्ग-२ म्हणुन नविन अविभाज्य शर्तीवर धारण करेल.

७] प्रतिग्राहित्याने जागेचा वापर दिलेल्या कारणासाठीच केला पाहिजे व ताबा घेतलेचे तारखेपासुन दोन वर्षाचे आंत जागेचा वापर पूर्वx पूर्ण रित्या केला पाहिजे.

८] प्रतिग्रहित्यास सदर जमीन अथवा जमीनीचा काही भाग इमारत अथवा इमारतीचा काही भाग शासनाचे पूर्व परवानगी शिवायच तात्पुरता अथवा कायम स्वरुपी इतर अन्य कारणासाठी वापरता येणार नाही. अशी परवानगी देणे याबाबत शासनास पूर्ण मुभा राहील. अशी परवानगी दिलीच तर शासन विशिष्ट शर्तीवर अथवा प्रिमीयम आकारुन देईल.

९] प्रतिग्राहिता संस्थेने सदर माध्यमिक शाळेत जातीभेद व लिंगभेद न मानता प्रवेश सर्वांसाठी खुला ठेवला पाहिजे.

१०] प्रतिग्राहिता संस्थेने जागेचा ताबा घेतल्याचे तारखेपासुन दोन वर्षाचे आंत प्रति चौ. मि. १०० यास एक याप्रमाणे झाडे लावली पाहिजेत व ती जगवली पाहिजेत.

११] प्रतिग्राहिता यांना प्रदान करणेत आलेल्या जमीनीवरील गौण खनिज अथवा खाणी यावरील अधिकार महाराष्ठ जमीन महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाकडे राहील. तसेच एखादया वालु खाणी कडे जाणेसाठी रस्ता सदर जागेतुन वापरणेस शासनास मुभा राहील.

१२] प्रतिग्राहिता यांना जमिनीचे विकासासाठी येणारा खर्च करावा लागेल.

..३..

मुख्याध्यापक
पवना विद्या मंदिर
पवनानगर, ता.मावळ, जि.पुणे

मुख्याध्यापक
पवना विद्या मंदिर
पवनानगर, ता.मावळ, जि.पुणे

१३] प्रतिग्राहित्याने यांनी आदेशाचे तारखेपासुन तीन महिन्याचे आंत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम व शासकीय जमीनीची निर्गती नियम १९७१ मधील तरतुदीनुसार विहित नमुन्यात सनद करून घ्यावी.

१४] प्रतिग्राहिता यांनी उक्त शर्तीपैकी कोणत्याही शर्तीच्या किंवा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या किंवा त्याखाली केलेल्या नियमाचा कोणत्याही उपबंधाचे पालन करणेस कसुर झाल्यास जिल्हाधिकारी यांचेकडुन उक्त आदेश रद्द होणेस पात्र ठरेल आणि त्यानंतर तो जमिनीच्या उक्त तुकडयाचा कब्जा तावडतोब परत देईल आणि नोटीस किंवा कोणतीही भरपाई दिल्याशिवाय प्रतिग्राहित्यास काढुन लावील. किंवा अशा रितीने जमीनीचा कब्जा परत घेण्या ऐवजी या पट्टयाच्या वर्ग -२ च्या विरोधी असेल असे जमिनीवर उभारलेले कोणतेही बांधकाम जिल्हाधिकारी यांचेकडुन निश्चित करणेत येईल. अशा कालावधीत पाडुन टाकणेबाबत आदेश देईल. उक्त कालावधीत उक्त बांधकाम पाडुन टाकणेत आले नाही तर प्रतिग्राहिता खर्चाने ते पाडुन टाकणेची व्यवस्था करणेत येईल. आणि शासनाचे आदेशास अधिन राहुन परिस्थितीनुसार त्याला इष्ट वाटेल अशा वरीलपैकी एक किंवा दुस-या उपायांचा अंगिकार करणे हे जिल्हाधिकारी यांचे स्वेच्छा निर्णयावर अवलंबुन राहील.

१५] प्रतिग्राहित्यास देणेत आलेली जमीन अथवा तिचा काही भाग ~~अथवा/रितवा~~ शासनाला सार्वजनिक कारणासाठी हवा असल्यास त्या जमिनीचा अथवा भागाचा आदेश रद्द करून जमीन शासनाचे ताब्यात घेणेत येईल. सदर जमीनीचा जेवढा भाग घेणेत येईल त्याचे प्रमाणांत रक्कम संस्थेस अदा करणेत येईल. जर सदर जागेवर इमारत असेल तिची किंमत कार्यकारी अभियंता [ सार्वजनिक बांधकाम विभाग ] यांचे कडुन ठरविणेत येईल. सार्वजनिक कामासाठी लागणा-या जमिनीचे बाबत शासनाचा निर्णय संस्थेस स्विकारावा लागेल.

१६] प्रतिग्राहित्याने उपरोक्त शर्तीपैकी एक अथवा अनेक शर्तीचा भंग केल्यास त्यांना देणेत आलेली जमीन काढुन घेण्यात येईल व त्यासाठी जमिनीबाबत अथवा त्यावरील इमारतीसाठी कोणतीही नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

सही/-[श्रीनिवास पाटील]
जिल्हाधिकारी पुणे

प्रति,
मा. अध्यक्ष,
नुतन महाराष्ट्र विदया प्रसारक मंडळ,
तळेगांव स्टेशन तालुका मावळ.

मुख्याध्यापक
पवना विद्या मंदिर
पवनानगर, ता.मावळ, जि.पुणे

मुख्याध्यापक
पवना विद्या मंदिर
पवनानगर, ता.मावळ, जि.पुणे

प्रत:- १] मा. तहसिलदार मावळ

२/- प्रश्नाधिन जमीनीची १४३०.४७४२ चौ. मि. [ १५३९८ चौ.फुट ] इतके जमीनीत असलेले शेड क्रमांक ४ व ५ सहीत पाटबंधारे खात्याचे ताब्यातुन काढुन घेऊन महसुल खात्याकडे प्रथम वर्ग करुन घ्यावे. तसेच संस्थेकडुन कब्जेहक्काचे किंमत रुपये ५३२/- भरुन घ्यावी शर्त क्रमांक ३ व ४ प्रमाणे पूर्तता झालेवर संस्थेस जमीनीचा ताबा देणेबाबत कार्यवाहीपूर्ण करावी ताबे पावती पंचनामा व दुरुस्त उतारे यासह अहवाल पाठवावा.

२] मा. कार्यकारी अभियता, खडकवासला कालवा विभाग क्रं. १ पुणे-१

३] मा. आयुक्त पुणे विभाग पुणे-१ यांजकडेस सविनय सादर.

४] मा. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडेस माहितीसाठी सविनय सादर.

जिल्हाधिकारी पुणे करिता.

मुख्याध्यापक
पवना विद्या मंदिर
पवनानगर, ता.मावळ, जि.पुणे

मुख्याध्यापक
पवना विद्या मंदिर
पवनानगर, ता.मावळ, जि.पुणे

# कर आकारणी रजिस्टर उतारा (नमुना नं. ८) (नियम ३२ (१)

सन २०१५-१६- २०१८-१९ या वर्षासाठी करास पात्र इमारती व जमीन यांची आकारणी यादी

(नमुना नंबर ८)

सन -२०१५-१६ २०१८-१९ ग्रामपंचायत कान्हे ता. मावळ , जि.पुणे.

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | सिटी स.नं. | मालमत्ता क्रमांक | मालकाचे नाव | भोगवटादाराचे नाव | मालमत्तेचे वर्णन | मिळकत बांधकामाचे वर्ष | क्षेत्रफळ चौ.फूट/ चौ.मी. | रेडीरेकनर दर प्रती चौ. मीटर जमीन | इमारत | बांधकाम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ३२८ | १ | - | ८८ | पवना विद्या मंदिर पवनानगर | पवना विद्या मंदिर पवनानगर | आरसीसी पद्धतीचे घर RCC बांधकाम पहिला मजला आर सीसी पद्धतीचे घर RCC बांधकाम पहिला मजला इतर पक्के घर (दगड विटांचे चुना किंवा सिमेंटमध्ये पक्के बांधकाम वर (मेडी-प्रि) फ्रा ऑफिस पहिला मजला इतर पक्के घर (दगड विटांचे चुना किंवा सिमेंटचे घर) १८.५x१६.१० = २९७.८५ स्व. शौचालय | २००९<br>२००९<br>२००९<br>२००९ | १६८.८ (१८१८ चौ.फु)<br>१६८.८ (१८१८ चौ.फु)<br>४६.६७ (५०२ चौ.फु)<br>० चौ. फु | ११८०<br>११८०<br>११८०<br>११८० | | १५४<br>१५४८<br>१३६<br>१३८ |

| घसारा दर | इमारतीचा वापरानुसार भारांक | भांडवली मुल्य (रु.) | कराचा दर (पैसे) | कराची रक्कम रुपये घरपट्टी | दिवाबत्ती | आरोग्य | पाणीपट्टी | एकुण | अपिलाचा निकाल त्यानंतर केलेल्या फरकासह घरपट्टी | दिवाबत्ती | आरोग्य | पाणीपट्टी | एकुण | नंतर वाढ / घट झालेल्या बाबतीत आदेशाचा संदर्भ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ |
| ०.९ | १ | २५३९८०५ | २ | ५०८० | ४० | ४० | | १०५९८ | | | | | | |
| ०.९ | १ | २५३९८०५ | २ | ५०८० | | | | | | | | | | |
| ०.९ | १ | ६३७२३३ | ०.७५ | ४७८ | | | | | | | | | | |
| ०.९ | १ | - | ०.७५ | | | | | | | | | | | |

मुख्याध्यापक
पवना विद्या मंदिर
पवनानगर, ता. मावळ जि. पुणे

नमुना नं. ८ र. नं. ---------- पा. नं. -१०८----- वरुन अस्सल नक्कल तयार दि.

नक्कल फी ---------- रु. दि.

ग्रामसेवक
ग्रामपंचायत

मुख्याध्यापक
पवना विद्या मंदिर
पवनानगर, ता.मावळ, जि.पुणे